# आचार संहिता

१) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या व्यवस्थेसंबंधीची माहिती प्रसिध्दि करीता देता कामा नये. अशा प्रकारात विद्यार्थी दोषी आढळल्यास त्याचेवर शिस्तभंगाची कार्यवाही होईल. विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयातील तसेच बाहेरील असभ्य वर्तणुकीची गंभीर दखल घेतली जाईल.

२) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक कायदा क्र.३३, १५ मे १९९९ नुसार रॅगिंग घेण्यास सक्त मनाई आहे.

* विद्यार्थ्याचे इतर विद्यार्थी / विद्यार्थीनी सोबत वर्तन सभ्यतापूर्वक असावे. विद्यार्थीनींची टिंगल व कोणतेही असभ्य वर्तन करु नये तसेच विद्यार्थी – विद्यार्थीनींची रॅगिंग घेऊन कोणत्याही प्रकारचा त्रास देऊ नये. अन्यथा, शासकीय नियमाप्रमाणे कडक कार्यवाहीस पात्र राहील.

" Ragging" means display of disorderly conduct, doing of any act which causes or is likely to cause physical or psychological harm or raise apprehensions of fear or shame or embarrassment to a student is any educational institution and includes I Teasing, abusing, threatening or play practical jokes on, or cause hurt to such student or ii) asking a student to do any act or perform something which such student will not in the ordinary course, willingly do.

* विद्यार्थी महाविद्यालयाच्या परिसरात किंवा महाविद्यालयाच्या बाहेरील इतर शैक्षणिक संस्थामध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रॅगिंग घेताना किंवा त्यामध्ये सहभाग असल्याचे आढळल्यास त्याला शासकीय नियमानुसार दोन वर्ष तुरुंगवास किंवा रु.१०,००० दंड होऊ शकतो.
* रॅगिंग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव शासकिय नियम 15th May 1999, कलम 4 नुसार महाविद्यालयाच्या पटावरुन काढून टाकण्यात येईल व त्या विद्यार्थ्याला कार्यवाहीच्या दिनांकापासून पाच वर्षेपर्यंत इतर कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळणार नाही.
* अशा प्रकारात विद्यार्थी दोषी आढळल्यास त्याचेवर निलंबनाची कार्यवाही होऊ शकते.

३) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याने लगेच महाविद्यालय सोडले तर त्यांना पूर्ण सत्राचे शुल्क द्यावे लागेल.

४) विद्यार्थ्याने प्राचार्यांच्या आज्ञेचे पालन करावे, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याशी सभ्यतेने व नम्रतेने वागावे. त्यांची अवज्ञा करु नये तसे केल्यास ती गैरशिस्त समजून तो विद्यार्थी कडक कार्यवाहीस पात्र राहील. बेशिस्त, अनुपस्थिती व इतर कोणत्याही कारणावरुन विद्यार्थ्याचे नाव महाविद्यालयाच्या पटावरुन काढून टाकण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे. या बाबतीत प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहील.

५) प्राचार्यांच्या परवानगीशिवाय महाविद्यालयाच्या आवारात कसल्याही प्रकारची निदर्शने, सभा किंवा इतर कोणताही कार्यक्रम घेता कामा नये. तसेच भिंतीपत्रके,प्रतिमा लावता येणार नाही. असे झाल्यास कडक कार्यवाही करण्यात येईल.

६) कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र पूर्ण सत्राची फी भरल्याशिवाय मिळणार नाही. तसेच महाविद्यालयात प्रवेश घेतांना भरलेली फी कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.

७) महाविद्यालयाने दिलेले ओळखपत्र नेहमी सोबत ठेवावे. ओळखपत्राशिवाय महाविद्यालय व ग्रथालयात प्रवेश करु नये तसेच परिसरात फिरु नये.

८) महाविद्यालयाच्या सर्व परीक्षा अनिवार्य आहेत. प्रत्येक विषयात २० टक्केपेक्षा जास्त गुण मिळविणे आवश्यक आहे. यापेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

९) प्रत्येक विद्यार्थ्याने नियमित व वक्तशीर असावे. त्याची उपस्थिती ७५ टक्के पेक्षा अधिक असावी. वैद्यकीय किंवा इतर कारणामुळे गैरहजर राहणे आवश्यक असेल तर पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. विनापरवानगी गैरहजर असणाऱ्या विद्यार्थ्यास प्रति दिवस ५ रु. (पदवी), ५० रु. (पदव्युत्तर) दंड आकारण्यात येईल किंवा त्याचे हजेरी पटावरुन नांव कमी करण्यात येईल.

१०) महाविद्यालयाच्या प्रांगणात धुम्रपान करणे, पान खाने, तंबाखु-गुटखा किंवा अन्य अंमली पदार्थ चघळणे आणि चेहरा झाकून महाविद्याल्यात प्रवेश करणे यास सक्त मनाई आहे. अशा प्रकारात विद्यार्थी दोषी आढळल्यास त्याचेवर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

११) महाविद्यालय परिसरात मोबाईल (भ्रमणध्वनी) सायलेंट मोडवर ठेवावा. तसेच परवानगी शिवाय मोबाईल वापरण्यास बंदी आहे. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१२) विद्यापीठ नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्याला शारीरिक क्षमता चाचणी व वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. गैरजर विद्यार्थांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१३) **गणवेश संहिता (Dress Code) :** महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी गणवेश संहिता (ड्रेसकोड) लागू आहे, परंतु फारच अपरीहार्य कारणाने विद्यार्थ्यांने महाविद्यालयाचा गणवेश परिधान केला नसल्यास अशा विद्यार्थ्यांनी पॅन्ट, शर्ट, शुज, आणि विद्यार्थीनी नी सलवार, कमिज सोबत दुपट्टा, साडी या प्रकारातील (पेहराव) शिष्टाचार संमत कपडेच परिधान करणे अपेक्षित आहे. यास्तव कोणीही टी-शर्ट, जिन्स पॅन्ट, टॉप्स, अद्ययावत तंग कपडे, समारंभासाठी परिधान करावयाचे कपडे, बाहया नसलेले कपडे किंवा टोपी, गॉगल्स व अन्य बाबी कुणीही महाविद्यालय परिसरात प्रवेशित असतांना परिधान केलेले असू नये.

सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश घेतेवेळी महाविद्यालयाने निश्चित केलेल्या युनिफॉर्मसाठी विद्यार्थी ग्राहक भांडारातून कापड घेणे आवश्यक राहील.

**टिप : १) शैक्षणिक सत्र २०२२-२०२३, दिनांक १/७/२०२२ पासुन सुरु हाईल.**

**२) २०२२-२०२३ या शैक्षणिक सत्राचे शैक्षणिक नियमिका विद्यापीठाने प्रसिद्ध केल्या नंतर विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे देण्यात येईल.**